(6)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धाराशिव **P.S.(ठाणे):** कळंब

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0185 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 12/05/2026 04:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date From (दिंनाक पासून):** 11/05/2026

**Date To ( दिंनाक पर्यंत):** 11/05/2026

**Time From (वेळेपासून):** 21:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 21:52 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 12/05/2026 **Time (वेळ):** 04:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 011

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 12/05/2026 04:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** कळंब शहरातील, तांदळवाडी रोडवरील,हटेल गुलमोहर बिंयाणी हाऊस सम

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): बाळु संपती जाधवर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग जालना,कळंब ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग जालना,कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9881463365

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अशोक दादाराव करवर | | | 1. दत्तनगर कळंब जिधाराशिव , कळंब ,धाराशिव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | सिध्देश्वर ऊर्फ सिंध्दाथ प्रकाश शिंदे | | | 1. शिवाजीनगर,डेंगळे हस्पीटलच्या पाठीमागे,संकल्प बिल्डिंगचे समोर कळंब,कळंब ,धाराशिव, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

(8)



| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 36,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 36,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

36,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिंनाक 12.05.2026.

मी, बाळु संपती जाधवर, वय 47 वर्ष, व्यवसाय-पोलीस उप अधीक्षक नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग जालना मो.नं.9881463365 ईमेल आयडी bjadhawar@gmail.com.

पोलीस ठाणे कळंब जि.धारशीव येथे समक्ष हजर राहून फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग जालना येथे दिंनाक 26.08.2024 रोजी पासुन पोलीस उप अधीक्षक म्हणुन कार्यरत आहे.

दिंनाक 10.05.2026 रोजी तक्रारदार नामे सलमान फारुक खुरेशी वय 33 वर्ष व्यवसाय व्यापार रा.मदिना मोहल्ला, केज ता.केज जि.बीड यांनी स्वहस्तक्षरात तक्रार दिली की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. मी दिंनाक 02.02.2026 रोजी पासुन कळंब शहर जि.धाराशिव येथे रिलॅक्स स्पा सेंटर या नावाने व्यवसाय चालवुन उपजिविका भागवतो. मी स्पा सेंटरचा व्यवसाय चालु केल्यापासुन पोलीस स्टेशन कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर हया दोघांनी माझ्या कडुन स्पा सेंटरचा व्यवसाय चालविण्यासाठी हप्ता म्हणुन दोन महिन्याचे 52,000/-रुपये घेवुन गेलेले आहे. त्यावर मी त्या दोघांना विचारले की, माझी व पीआय साहेब तसेच दुय्यम अधिकारी यांची भेट घालुन द्या असे म्हणालो असता करवर आणि शिंदे यांनी मला सांगीतले की, तु जर साहेबांना भेटलास तर साहेब आम्हाला तुझा स्पा चा व्यवसाय बंद करून तुझ्यावर कारवाई करण्यास लावतील, तुझा धंदा सुरळीत चालवायचा असेल तर तुला आम्हाला हप्ता द्यावा लागेल व त्याविषयी जर काही बोलायचे असेल तर ते तुला आमच्या दोघांशीच बोलावे लागेल, असे म्हणाले होते.

दिंनाक 06.05.2026 रोजी पोलीस स्टेशन कळंब येथील पोलीस कर्मचारी अशोक करवर यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9766888048 यावरील हॉटसअॅप वरुन माझ्या मोबाईल क्रमांक 9860444420 यावरील हॉटसअॅप वर कॉल करुन स्पा सेंटरचा व्यवसाय चालु ठेवण्यासाठी दुय्यम अधिकारी यांचा हप्ता म्हणुन 20,000/-रुपये मागणी करुन मला दिंनाक 10.05.2026 रोजी पोलीस स्टेशन कळंब येथे भेटण्यासाठी बोलावले.

तसेच दिंनाक 07.05.2026 रोजी पोलीस स्टेशन कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9011116364 यावरील हॉटसअॅप वरुन माझ्या मोबाईल क्रमांक 9860444420 यावरील हॉटसअॅप वर कॉल करुन स्पा सेंटरचा व्यवसाय चालु ठेवण्यासाठी पीआय साहेबांचा हप्ता म्हणुन 20,000/-रुपये मागणी करुन मला पोलीस स्टेशन कळंब येथे भेटण्यासाठी बोलावले. पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर या दोघांनी मिळुन मला 40,000/- रुपये हप्तापोटी मागणी केली आहे.

मला पोलीस ठाणे कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांना स्पा सेंटरचा व्यवसाय चालु ठेवण्यासाठी पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी कोणतीही वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांच्याशी माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. ते मागणी करीत असलेले पैसे हे लाच असल्याचे मला माहिती असल्याने मी अॅन्टी करप्शन ब्यूरो जालना येथील श्री.जाधवर साहेबांना त्यांचा मोबाईल क्रमांक 9881463365 यावर माझा भाऊ जमीर खुरेशी यांचे मोबाईल क्रमांक 9798464646 यावरुन दिंनाक 08.05.2026 रोजी संपर्क करुन माझी तक्रार असल्याचे कळवून त्यांना दिंनाक 10.05.2026 रोजी कळंब येथे येण्याची विंनती केली होती. त्यावरून श्री.जाधवर साहेब हे त्यांचे पथकासह व शासकीय पंचासह कळंब येथे आले असता मी त्यांच्या कडे तक्रार देत आहे.



Scanned with OKEN Scanner

मी आज दिंनाक 10.05.2026 रोजी पोलीस ठाणे कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांची भेट घेवून त्यांना मी स्पा सेंटरचा व्यवसाय चालु देण्याबाबत बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी माझ्या कडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेवर कायदेशीर कारवाई करावी ही विंनती अशा मजकुराची तक्रार दिली होती. त्यानंतर मी तक्रारदार सलमान खुरेशी व पंचाची ओळख करुन त्यांना तक्रारदार सलमान खुरेशी यांनी दिलेली तक्रार दाखविली. त्यानंतर तक्रारदार सलमान खुरेशी यांनी दिलेल्या लेखी तक्रारी वर तक्रारदार सलमान खुरेशी, पंचानी व मी सह्या करुन तक्रार ताब्यात घेतली. तक्रारदार सलमान खुरेशी यांनी पोलीस स्टेशन कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय? ते तक्रारदार यांच्या कडे लाच मागतात काय? याची खात्री करण्यासाठी दिंनाक 10.05.2026 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय घेण्यात आला.

त्यावरुन दिंनाक 10.05.2026 रोजी आम्ही तक्रारदार सलमान खुरेशी, दोन्ही पंच व सापळा पथकास तश्या सविस्तर सूचना देवुन माझे सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व तक्रारदार सलमान खुरेशी यांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी पिशवीत टाकुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतुन बनियानला बांधुन दिला. त्यानंतर तक्रारदार सलमान खुरेशी व पंच क्र.1 कापरे असे तक्रारदार यांच्या जवळील कारने पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर याना भेटण्यासाठी गेले. मी व सापळा पथक कळंब शहराच्या जवळ सुरक्षित ठिकाणी थांबुन राहिलो. त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार सलमान खुरेशी व पंच क्र.1 कापरे असे आम्ही थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी परत आले. तेंव्हा तक्रारदार सलमान खुरेशी यांचे जवळील व्हाईस रेकॉर्डर माझे सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण मी तक्रारदार व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये पोलीस स्टेशन कळंब येथील पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे यांनी तक्रारदार सलमान खुरेशी यांना स्पा सेंटरचा व्यवसाय चालु ठेवण्यासाठी पीआय साहेबांचा हप्ता म्हणुन 20,000/-रुपये व पोलीस कर्मचारी अशोक करवर यांनी चार दुय्यम अधिकारी यांचा हप्ता 16,000/-रुपये असे एकुण दोघांनी मिळुन 36,000/-रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम दिंनाक 11.05.2026 रोजी स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच पडताळणी कारवाई दरम्यान निष्पन्न झाले. त्यावरुन आम्ही सर्वानुमते पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांचे विरुध्द दिंनाक 11.05.2026 रोजी सापळा लावण्याचे ठरवुन त्याबाबत तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर दिंनाक 11.05.2026 रोजी आम्ही सर्वानुमते पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरवुन माझ्या सूचने वरुन शासकिय वाहनात पोलीस अंमलदार चेके यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन तक्रारदार व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविले. पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांना लाच म्हणुन देण्यासाठी तक्रारदार यांनी हजर केलेल्या पाचशे रुपये दराच्या 72 नोटा एकुण 36,000/- रुपये रक्कमेला ॲथ्रासीन पावडर लावली. सदरील ॲथ्रासीन पावडर लावलेल्या नोटा तक्रारदार यांच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचाना सविस्तर सुचना देवुन पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांनी लाच स्विकारल्या नंतर डाव्या हाताने उजव्या हाताची बाही वर करुन इशारा करणे बाबत तक्रारदार यांना सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन तश्या सूचना देण्यात आल्या. त्याबाबत तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर माझे सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन तक्रारदार यांच्या शर्टाच्या आतुन बनियानला बांधुन देवुन तक्रारदार सलमान खुरेशी यांना पंच क्र.1 कापरे यांचे सोबत तक्रारदार यांच्या जवळील कारने पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांना भेटण्यासाठी कळंब येथील तांदळवाडी रोडवर पाठविण्यात आले. त्यांच्या पाठीमागे मी, सापळा पथक व पंच क्र.2 सकट असे आम्ही तांदळवाडी रोडवरील हॉटेल गुलमोहर बियाणी हाऊस समोरील परिसरात एकमेकांना दिसतील अशा रितीने सापळा लावून थांबलो.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार सलमान खुरेशी यांनी त्यांच्या जवळील कारमधुन उतरुन लाच स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला ती वेळ ठिक 21.52 वाजेच्या सुमारास होती. त्यानंतर सापळा पथक तात्काळ सक्रीय होवून पंच क्र.2 सकट यांचे सह त्या ठिकाणी आले. माझ्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी तक्रारदार यांच्या कडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन बंद केला. त्यानंतर मी पंच क्र.1 कापरे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 कापरे यांनी तक्रारदार यांच्या कारमध्ये पाठीमागील सिटवर बसलेल्या इसमाकडे अंगुली निर्देश करुन हेच पोलीस कर्मचारी अशोक करवर असुन त्यांनीच



Scanned with OKEN Scanner

तक्रारदार सलमान खुरेशी यांचे कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम घेऊन त्यांच्या शर्टाच्या खिश्या मध्ये ठेवली आहे असे सांगितल्याने पोलीस कर्मचारी अशोक करवर यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवर रंगेहाथ पकडण्यात आले. त्यानंतर मी पोलीस कर्मचारी अशोक करवर यांना माझी, दोन्ही पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर पोलीस कर्मचारी अशोक करवर यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अशोक दादाराव करवर वय 34 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस कॉन्स्टेबल ब.न.417 नेमणुक पोलीस स्टेशन कळंब रा.श्री. चौधरी यांचे घरी किरायाने, दत्तनगर कळंब जि.धाराशिव असे सांगीतले. त्यानंतर मी पोलीस कर्मचारी अशोक करवर यांना स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी तक्रारदार सलमान खुरेशी यांच्या कडुन घेतलेली लाचेची रक्कम त्यांच्या शर्टाच्या खिश्या मध्ये ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 सकट यांनी पोलीस कर्मचारी अशोक करवर यांच्या शर्टाच्या खिश्या मधुन लाचेचे 36,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. तसेच माझे सूचने वरुन पोलीस कर्मचारी अशोक करवर यांचे हात, लाचेची रक्कम व शर्ट अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने चेक केले असता पोलीस कर्मचारी अशोक करवर यांच्या उजवा हात, लाचेची रक्कम व शर्टाच्या खिश्या मध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 36,000/- रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. त्यानंतर मी, सापळा पथक, दोन्ही पंच, पोलीस कर्मचारी अशोक करवर असे आम्ही पोलीस स्टेशन कळंब व परिसरात जावुन पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे यांचा शोध घेतला असता ते मिळुन आले नाही. त्यानंतर आम्ही पोलीस स्टेशन केज जि.बीड येथे जावुन त्याबाबत तसा पंचनामा केला.
तरी दिंनाक 10.05.2026 रोजी पोलीस कर्मचारी सिंध्दाथ शिंदे व अशोक करवर यांनी पंच क्र.01 कापरे यांचे समक्ष तक्रारदार यांच्या कडे अनुक्रमे स्पा सेंटरचा व्यवसाय चालु ठेवण्यासाठी पीआय साहेबांचा हप्ता म्हणुन 20,000/-रुपये व चार दुय्यम अधिकारी यांचा हप्ता 16,000/-रुपये असे एकुण दोघांनी मिळुन 36,000/-रुपये लाचेची मागणी करुन दिंनाक 11.052026 रोजी 21.52 वाजेच्या सुमारास कळंब शहरातील तांदळवाडी रोडवरील हॉटेल गुलमोहर बिंयाणी हाऊस समोर तक्रारदार यांच्या जवळील कारमध्ये पोलीस कर्मचारी अशोक करवर यांनी पंच क्र.01 कापरे यांचे समक्ष उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन शर्टाच्या खिश्या मध्ये ठेवली म्हणुन माझी लोकसेवक अशोक दादाराव करवर पोलीस अंमलदार ब.न.417 व लोकसेवक सिध्देश्वर ऊर्फ सिंध्दाथ प्रकाश शिंदे पोलीस अंमलदार ब.न.1389 यांचे विरुध्द कलम 7 भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.
मी दिलेली वरील फिंयाद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.
समक्ष ही फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

AJIT TUKARAM CHINTLE(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): AJIT TUKARAM CHIN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, कळंब
जि. धाराशिव



Scanned with OKEN Scanner